# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३ E-mail: ronagpur.dte@ gmail.com फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३


क्रमांक :- तंशिस/प्राकाना/शैवि-१/२०१३/ 3657

दिनांक:- 23 OCT 2013

प्रति,

संचालक/प्राचार्य

सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर संस्था तसेच तस्सम संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

विषय :- अल्पसंख्यांक शैक्षणिक कर्ज योजनेची जाहिरात आपल्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :- १. मा. संचालक, तंशिसं, मरा.मुंबई यांचे पत्र क्रं. का.क्रं.१८/तंशिसं/अल्प.वि./मौ.आ.अल्प/२०१३/२१२, दि. १५-१०-२०१३

२. मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, यांचे पत्र क्रं. शै.क.जा.२, दि.१९-०९-२०१३.

उपरोक्त संदर्भाधिन पत्राची प्रत सोबत जोडली आहे मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत व्यावसायिक शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येतात. यांचा लाभ राज्यातील मुस्लिम/शीख/ख्रिश्चन/पारसी/बौध्द/जैन या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यांत येतो. तरी सोबत जोडलेल्या संदर्भ क्रं. २ च्या पत्राप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी तसेच ह्या पत्राची प्रत संस्थेच्या सुचना फलकावर लावण्यांत यावी.

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,

नागपूर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी -, २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७.
E-mail : mcm.dte@gmail.com Internet : http://www.dte.org.in/mcm


का.क्र.१८/तंशिसं/अल्प.वि./मौ.आ.अल्प/२०१३/
दिनाक : 15 OCT 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/नागपूर

**विषय : अल्पसंख्याक शैक्षणिक कर्ज योजनेची जाहिरात आपल्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याबाबत...**
**संदर्भ : मोआम/जाहिरात/२०१३/२९७६, दि.२४.०९.२०१३**

उपरोक्त संदर्भाधिन पत्राची प्रत सोबत जोडली आहे मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत व्यावयायिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येतात. यांचा लाभ राज्यातील मुस्लिम/ शीख/खिश्चन/पारसी/बौध्द/जैन या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यांत येतो तरी आपल्या अधिपत्याखाली सर्व संस्थामध्ये शिकणा-या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना त्यांचा लाभ व्हावा यासाठी सोबत जोडलेल्या प्रपत्र सर्व संस्थाना देण्यात यावे आणि सर्व संस्थाना सुचना फलकावर लावण्यास कळविण्यांत यावे.

(डॉ.सुभाष महाजन)
प्र.सचालक, तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रादेशिक कार्यालय, नागपूर
क्रमांक ...8613...

\\192.168.1.8\itdc\bhaingade\dte desk fills doc\R.O. Latter doc

# मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ

( कंपनी कायदा १-१९५६ अंतर्गत नोंदणीकृत - महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )
डी.डी. बिल्डिंग, २ रा मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई- ४०००२३.
दूरध्वनी - २२६५३०८०, २२६७२२९३ फॅ.नं -२२६७२२९४ ई-मेल : maulana_azad@rediffmail.com

क्रमांक :शै.क.जा.-२, दि.१८/८/१३

## अल्पसंख्यांक शैक्षणिक कर्ज योजना

**मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई** मार्फत राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना व्यावसायिक, तांत्रिक व रोजगाराभिमुख शिक्षण घेण्यासाठी मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजना व राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना अंतर्गत अर्ज मागविण्यात येत आहेत. **मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज** योजनेअंतर्गत रु.२.५० लाखापर्यंत कर्ज तसेच **राजीव गांधी शैक्षणिक कर्ज** योजनेअंतर्गत रु.५.०० लाखापर्यंत द.सा.द.शे. ३% व्याज दराने कर्ज दिले जाईल.

### ❖ अर्जदारासाठी पात्रता, अटी व शर्ती :

१) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.
२) अर्जदार हा अल्पसंख्यांक (मुस्लिम/शीख/ख्रिश्चन/पारसी/बौध्द/जैन) समुदायातील असावा.
३) प्रवेश घेतलेला अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थेस, केंद्र / राज्य शासन /ए.आय.सी.टी.इ./आय.एम.सी / यु.जी.सी इ. शासकीय प्राधिकरणाची मान्यता असणे आवश्यक आहे.
४) मौलाना आजाद शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत कर्जासाठी अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख तर राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत ग्रामीण भागासाठी रु.८१,०००/- तर शहरी भागासाठी रु.१,०३,०००/- इतके राहील.

### ❖ अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे / दस्तावेज

**१)महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी पुरावा:**आधारकार्ड/पासपोर्ट/बँक पासबुक/ड्रायव्हिंग लायसेन्स/दूरध्वनी देयक/विद्युत देयक/इलेक्शन कार्ड तसेच तहसिलदार / जिल्हा दंडाधिकारी यांनी दिलेले रहिवाशी प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक.
**२)पालकाचे ओळखपत्र:**आधारकार्ड/पासपोर्ट/बँक पासबुक/पॅनकार्ड/ड्रायव्हिंग लायसेन्स/इलेक्शन कार्ड इ.
**३)उत्पन्नाचे प्रमाणपत्र:**कुटुंबप्रमुखाच्या नावे तहसिलदार/ तलाठी यांनी प्रमाणित केलेला उत्पन्नाचा दाखला / आयकरदात्या पालकासाठी - Form No.16.
**४)मागील वर्षाच्या परीक्षेची गुणपत्रिका.**
**५)प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र (Bonafide Certificate).**
**६)शैक्षणिक संस्थेकडून संपूर्ण अभ्यासक्रमाचे शैक्षणिक व इतर शुल्काबाबतचे पत्र.**
**७)वसतिगृह / खानावळ / शैक्षणिक साहित्य दरपत्रक.**
**८)जामिनदार-**नोकरदार जामिनदाराचा वेतन प्रमाणपत्र व हमी पत्र / मालमत्ताधारक जामिनदाराचा ७/१२ उतारा किंवा ८-अ उतारा व मुल्यांकन पत्र तसेच विहित नमुन्यातील हमीपत्र.
**१०)पालकाचे व जामिनदाराचे प्रतिज्ञापत्र.**
**११)विद्यार्थ्याच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असलेल्या पासबुकाची छायांकित प्रत.**

वरील सर्व साक्षांकित केलेल्या सत्यप्रती अर्जासोबत जोडून अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये सादर करण्यात यावा. अर्ज नमुना व इतर सर्व आवश्यक माहिती जिल्हा कार्यालय तसेच महामंडळाच्या संकेत स्थळ **www.mamfdc.org** येथे उपलब्ध आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख **१५ ऑक्टोबर, २०१३** हो राहील. कर्जाची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये ECS/NEFT द्वारे जमा करण्यात येईल त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नावे **राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे बंधनकारक आहे.** शैक्षणिक कर्जाचा परतफेडीचा कालावधी शैक्षणिक कालावधी पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यापासून पुढील पाच वर्षासाठी राहील. मंजूर कर्जाची वसुली २० त्रैमासिक हप्त्यात करण्यात येईल.

**( अैनुल अत्तार )**
व्यवस्थापकीय संचालक